नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक २२/०२/२०२५ (शनिवार) दुपार

## खुन करणाऱ्या आरोपीला अटक

**पोस्टे पारशिवणी** :— आरोपी अभिजित देवेन्द्र ढोके, वय १९ वर्षे, रा. सिंगोरी तह. पारशिवनी आणि यातील मृतक अजिंक्य देवेन्द्र ढोके वय २१ वर्षे रा. सिंगोरी तह. पारशिवनी हे सख्खे भाउ असुन दिनांक २०/०२/२०२५ रोजी रात्री ०९/०० वा. दरम्यान यातील मृतक याने वडीलांना जेवन का बनवले नाही, या कारणावरून शिवीगाळ केली. यावरून यातील आरोपीने मृतक काम करत असलेल्या ठिकाणी मौजा सिंगोरी डब्ल्यु सी एल खदान येथे जावुन वडीलांना शिव्या का दिल्या या कारणावरून त्याचे जवळील लाकडी दंडयाने मृतकाचे डोक्यावर व पाठीवर वार करून जखमी केले व उपचारा दरम्यान मृतक मेयो हॉस्पीटल नागपूर येथे मरण पावला. सदर प्रकरणात हर्षल नंदु टोंगे वय २३ वर्षे, धंदा. सिंगोरी डब्ल्यु सी एल खदान येथे खाजगी नौकरी, रा सिंगोरी तह.पारशिवनी यांच्या रिपोर्ट वरून आरोपी नामे अभिजित देवेन्द्र ढोके ,वय १९ वर्षे रा. सिंगोरी तह. पारशिवनी याच्या विरूध्द कलम १०३ (१) भा.न्या.सं अन्वये गुन्हा नोंद केला असुन आरोपीला पारशिवणी पोलीसांनी अटक केली आहे.

## मा.मुख्यमंत्री यांचे १०० दिवसीय उपक्रमांतर्गत नागपुर ग्रामीण जिल्हयात विदयार्थीनींना देण्यात आले स्वसंरक्षणाचे धडे

मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक,नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनाखाली मा.मुख्यमंत्री ,महाराष्ट्र राज्य यांचे १०० दिवसीय उपक्रमांतर्गत खालील ठिकाणी विदयार्थीनींना स्वसंरक्षणाबाबत प्रशिक्षण देण्यात आले.

पोलीस स्टेशन कन्हान अंतर्गत दिनांक २१/०२/२०२५ रोजी साईबाबा आदिवासी आश्रम शाळा टेकडी, कन्हान येथे स्वसंरक्षणाबाबत प्रशिक्षण देण्यात आले तसेच मार्गदर्शन करण्यात आले. तसेच आत्मरक्षणा करिता कराटे प्रशिक्षका द्वारे प्रात्यक्षिक दाखवण्यात आले.

पोलीस स्टेशन पारशिवणी अंतर्गत दिनांक २१/०२/२०२५ रोजी केसरीमल पालीवालं विद्यालय व ज्युनियर कॉलेज, पारशिवनी येथे विदयार्थीनींना स्वसंरक्षणाबाबत प्रशिक्षण देण्यात आले.याकरिता सरोजिनी पब्लिक स्कूल, पारशिवनी येथिल शारीरिक शिक्षण विभाग प्रमुख श्रीमती हर्षाली घाटोळे, उपस्थित होत्या.त्यांनी विद्यार्थीनीना स्वसंरक्षण प्रात्यक्षिक करून दाखवले. तसेच आणीबाणीच्या प्रसंगी स्वत:चे संरक्षण कसे करायचे याचे धडे दिले.

.









पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर